|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

बातमी - 1

जळगाव दि. 1 ( ) विज्ञान हे केवळ ग्रह-ताऱ्यांपुरते मर्यादीत आहे हा समज दूर करून समाजातील प्रश्नांसमवेत विज्ञानाची सांगड घालण्याची सवय विद्यार्थी दशेपासून लावून घ्या असे आवाहन भाभा अनुसंशोधन केंद्रातील निवृत्त संशोधक प्रा.बी.एन.जगताप यांनी केले.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने संलग्नित महाविद्यालयातील विज्ञान शाखेच्या पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी या 1 ते 10 जून, 2018 या दरम्यान संशोधन वृध्दी जोपासण्यासाठी उन्हाळी कार्यशाळा (समर वर्कशॉप) आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेचे उद्‌घाटन करताना प्रा.जगताप बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर होते या वेळी प्रमुख अतिथी म्हणून नवी दिल्लीच्या विज्ञान प्रसार विभागाच्या प्रकल्प संचालक डॉ.इरफाना बेगम उपस्थित होत्या.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या कल्पनेतून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात गतवर्षापासून हा अभिनव उपक्रम राबविला जात असून हे दुसरे वर्ष आहे. पदवी स्तरावरील विज्ञान शाखेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी ही कार्यशाळा घेतली जात आहे.

उद्‌घाटनपर भाषणात प्रा.जगताप म्हणाले की, संशोधन, नाविन्यपूर्ण कल्पना आणि उद्योजकीय कौशल्ये यावर सध्या भर दिला जात असून या कार्यशाळेतून चांगले संशोधक भविष्यात निर्माण होतील. विज्ञान म्हटले की केवळ ग्रह-तारे असे नसून आपल्या अवती-भोवती विज्ञान आहे हे समजून घ्या. त्याची समाजातील प्रश्नांशी सांगड घाला. समाजातील प्रश्न विज्ञानाच्या माध्यमातून कसे सोडवता येतील यावर भर द्या असेही त्यांनी आवाहन केले. डॉ.इरफाना बेगम म्हणाल्या की, ज्ञानाचे संचीत जिवंत रहावे यासाठी ही कार्यशाळा आहे. तरूण संशोधक विद्यार्थ्यांच्या मनात जिज्ञासा हवी. संशोधन करताना येणाऱ्या अपयशाची कल्पना करू नका. संशोधन क्षेत्रात आंतरराष्ट्रीय परीप्रेक्ष्यात काम करत असताना मातृभाषा विसरू नका कारण तुम्ही केलेले काम मातृभाषेतूनच लोकांपर्यंत पोहोचणार आहे असे त्या म्हणाल्या.

अध्यक्षीय भाषणात प्रा.माहुलीकर यांनी संशोधनाबाबत विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण व्हावी यासाठी ही कार्यशाळा घेतली जात असून संशोधनाच्या दृष्टीने प्राथमिक माहिती या कार्यशाळेतून मिळते. प्रयोगशाळेपुरते केवळ संशोधन नसते तर आपल्या अवती-भोवती ते असते. चिकित्सक बुध्दीचा वापर करून आजूबाजूच्या घटनांकडे पहा आणि त्यातून संशोधनाला सुरूवात करा. नव्या पिढीकडून अधिक अपेक्षा आहेत असेही ते म्हणाले.

प्रारंभी प्रा.एस.टी.बेंद्रे यांनी प्रास्ताविकात आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.रत्नमाला बेंद्रे यांनी केले. समन्वयक प्रा.एच.एल.तिडके यांनी आभार मानले. 10 जून पर्यंत चालणाऱ्या या कार्यशाळेत तिनही जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयातील 50 विद्यार्थी सहभागी झाले आहेत. या कार्यशाळेत तज्ज्ञांचे व्याख्यान, अत्याधुनिक प्रयोगशाळांमध्ये प्रात्यक्षिक, विद्यापीठ आणि काही उद्योगांना भेटी, वैज्ञानिक, चित्रपट दाखविणे अशा प्रकारचे उपक्रम राबविले जाणार आहेत.

----xx----

बातमी - 2

जळगाव 1 ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंन्द्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाअंतर्गत विविध औद्यागिक संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या परीसर मुलाखतीत 10 विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

यात सारंग येवले (बजाज ऑटो, पुणे), ज्ञानेश्वर येवले, अंकित शेनमारे, अमोल पाटील, सुशांत जगदाळे,

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

**Public Relations Office** **जनसंपर्क विभाग**



अजय कोळी (अदानी विलमार लि. गुजरात), डिंपल झोपे व स्नेहा शुक्ला (निलॉन्स एन्टरप्राईजेस, जळगाव), समृध्दी खेडकर व सय्यद अख्तर ( टीसीएस, नाशिक) या विद्यार्थ्यांची परीसर मुलाखती मध्ये निवड करण्यात आली आहे.

निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर, प्रा.ए.यु.बोरसे, डॉ.आर.जे.सरदार, नियुक्ती व प्रशिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ.भुषण चौधरी, डॉ.राम भावसार, कविता मंडोरे आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

---

जा.क्र . : उमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 1 जून, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--

**(डॉ.सुनील पाटील )**

जनसंपर्क अधिकारी